
# बोलता नहीं करता हूं

मलबार हिल विभागाच्या प्रगतीसाठी गेल्या
५ वर्षात मी केलेले कार्य



**मंगल प्रभात लोढा**
*आमदार - मलबार हिल*



माझे स्फूर्तीस्थान - श्री.नरेंद्र भाई मोदी

प्रिय मित्रांनो,


आपला प्रतिनिधी म्हणून मी आपणांस भेडसावणाऱ्या समस्या या समजून घेऊन त्यांचे निराकरण करण्यासाठी आपल्या बरोबर काम केले आहे. आपणांस असलेल्या छोटया किंवा मोठया समस्यांचे निराकरण करणे हे मी माझे प्रथम आणि आद्य कर्तव्य समजतो. तसेच सदर समस्या सोडवतांना सुयोग्य व जास्तीत जास्त पाठपुरावा सुद्धा मी करतो. म्हणून महाराष्ट्रात कायदा व व्यवस्था राखण्याच्या माझ्या जबाबदारी बरोबरच मी आपणा सर्वांशी निगडीत असलेल्या शिक्षण, व्यवसाय व रोजगार, मोकळया जागा, पायाभूत सुविधा, आरोग्य याबाबतीतही सुधारणा व्हावी यासाठी मी प्रयत्न करतो. मी हाती घेतलेल्या विविध उपक्रमांची ठळक वैशिष्टये आपणास सादर करत आहे व आपल्या समर्थनाची व आशिर्वादाची आशा बाळगून आहे.

मंगल प्रभात लोढा

**मंगल प्रभात लोढा**
आमदार - मलबार हिल

**कॉंग्रेसच्या अराजक कार्यकाळामध्येही आपण यशस्वी झालो तर मग भाजपच्या राज्यात आपल्याला कितीतरी महत्वाची कामे करता येतील.**

महाराष्ट्रात काँग्रेसच्या गैरकारभारामुळे आपण हवालदिल झालो आहोत. सर्व विकासाची कामे ठप्प झाली आहेत. व्यवसाय बंद पडत आहेत. रोजगार कमी होत चालला आहे. महिला व वरिष्ठ नागरिक यांची सुरक्षितता धोक्यात आहे व पायाभूत सुविधा कोलमडून पडल्या आहेत. प्रत्येक प्रकल्पाचा खर्च हा मूळ मंजूरीच्या ३ ते ४ पट झाला असून सदर प्रकल्प पूर्ण होण्यास दुप्पट ते तिप्पट कालावधी लागतो. याचे मुख्य कारण हे सद्य सरकारचा भ्रष्टाचार व पक्षपातीपणा हे आहे. त्यांनी मुंबईच्या प्रगतीला खीळ घातली असून येथील सर्व विकास कामे ठप्प होतील असे निर्णय घेतले आहेत. अशा नकारात्मक आणि प्रगतीला अडथळा आणणाऱ्या परिस्थितीत मी माझ्या सहकारी कामगार व रहिवाश्यांसोबत मलबार हिल भागातील समस्या सोडविण्यासाठी सतत कार्य केले आहे. मला विश्र्वास आहे की माननीय श्री नरेंद्रभाई मोदी पंतप्रधान असताना येत्या ऑक्टोबर मधील निवडणूका झाल्यावर आमचे नवीन सरकार राज्यात आल्यावर आपण इतक्या वर्षाच्या अंधार काळातून प्रगतशील व मजबूत मुंबई बनवू शकू. मी आपल्यासाठी मलबार हिल हे एक जागतिक दर्जाचे ठिकाण बनविण्याचे स्वप्न बाळगून आहे.



# मी अचूक कायदे बनविण्यासाठी लढलो. कारण अचूक कायदेच आपले रक्षण करु शकतात.

**माहिती अधिकार अधिनियमांचा प्रारंभ व त्यातील महत्वपूर्ण सुधारणा :**

१९९७ मध्ये मी माहितीचा अधिकार प्रस्तावित केला ज्याचे नंतर केंद्र सरकारने अधिनियमात रूपांतर केले. त्यानंतर २०१३ मध्ये याचा दुरूपयोग रोखण्यासाठी मी सुधारणाही प्रस्तावित केल्या ज्यामध्ये अर्जदारास त्याचा सदर विषयाशी संबंध जाहीर करावा लागेल.



महाराष्ट्र में भी

3 जागरूक टाइम्स, मुंबई, बुधवार 3 अप्रैल 2013

## एनिमल वेलफेअर बोर्ड की मांग

मुंबई। केंद्र एवं देश के 20 राज्यों की तरह महाराष्ट्र में भी तत्काल एनिमल वेलफेअर बोर्ड बनाया जाना चाहिए। मलबारहिल के विधायक मंगलप्रभात लोढ़ा ने विधानसभा में सरकार से यह मांग करते हुए कहा कि प्रदेश में यह बोर्ड बनाने का प्रावधान होने के बावजूद सरकार इसमें विलंब कर रही है। विधानसभा में विधायक लोढ़ा की इस मांग पर विधानसभा अध्यक्ष दिलीप वलसे पाटिल ने पशुपालन मंत्री मधुकर चव्हाण को निर्देश दिए कि सरकार इस मामले में तत्काल सदन में अपना जवाब पेश करे। विधायक लोढ़ा ने विधानसभा में कहा कि सरकारी आंकड़ों के हिसाब से पिछले 4 सालों में देश से मांस का निर्यात 44 फीसदी बढ़ गया है। उन्होंने जानकारी दी कि 2008 में देश में कत्लखानों की संख्या 5.57 लाख थी, जो आज आश्चर्यजनक रूप से बढ़कर सिर्फ 5 सालों में 8.05 लाख हो गई है। बीते वर्ष में गोवंश सहित पशुधन के मांस के निर्यात का आंकड़ा 18 हजार करोड़ रुपए को भी पार कर सकता है। विधानसभा में लोढ़ा ने कहा कि महाराष्ट्र में अकाल पड़ने का कारण भी पशुधन का समाप्त होना ही है। उन्होंने सरकार से मांग की कि प्रदेश में भी शीघ्र एनिमल वेलफेअर बोर्ड बनाया जाना चाहिए, जिससे पशुधन की रक्षा की जा सके। विधानसभा अध्यक्ष के निर्देश पर पशुपालन मंत्री ने एक सप्ताह के भीतर एनिमल वेलफेअर बोर्ड के मामले में सरकार की तरफ से कारवाई पर जवाब देने का आश्वासन दिया। विधायक लोढ़ा ने विश्वास जताया कि सरकार इस मामले में कोई सकारात्मक फैसला



### महाराष्ट्रात पशू कल्याण मंडळाची स्थापना :

प्राणी मात्रांचे कल्याण हा माझ्या जिव्हाळयाचा विषय असून गोहत्या बंदी बाबतचा मुद्दा (बील) मी मांडला व माझ्या अथक प्रयत्नांमूळे महाराष्ट्रात प्रथमच पशूधन संरक्षणार्थ पशू कल्याण मंडळाची स्थापना झाली.

### मंदिरांचे सरकारीकरण थांबविले.

सरकारने अधिसूचना काढून मंदिरांचे सरकारीकरण करण्याबाबतचे बिल विधानसभेत प्रस्तावित केले होते. सदर बिल हे आपल्या अधिकारांची पायमल्ली असल्याकारणाने मी त्याला कडाडून विरोध केला. सरतेशेवटी सरकारला हे बिल दप्तरी दाखल करावे लागले.

**मी माहिती अधिकार कायद्याची अंमलबजावणी, गृहनिर्माण संस्था, अधिनियमांचे सुलभीकरण, स्थानिक संस्था कर विरोध  इत्यादी बाबतीत सकारात्मक बदल घडविण्यासाठी मी कायद्याचा वापर केला.**

### स्थानिक संस्था कराला  विरोध : मुंबई व महाराष्ट्राची स्थानिक करातून मुक्तता

मी स्थानिक संस्था कर विरोधाच्या निदर्शनांमध्ये हिरीरीने भाग घेतला व एफएएम, एमएसएसएमए इत्यादी व्यापारी संघटनांबरोबर प्रतिनिधित्व केले. तसेच विधानसभेत सदर बिलाला कडाडून विरोध

केला. माझ्या या हस्तक्षेपामूळेच मुंबई व महाराष्ट्रामध्ये सदर कायदा लागू झाला नाही. याबाबतीत व्यावसायिकांवर व दुकांनदारावरील विविध १० पोलीस ठाण्यामधे दाखल केलेले आरोपपत्रही मागे घेण्याबाबत सरकारला राजी करविले.

## गृहनिर्माण संस्था – अधिनियमाचे सुलभीकरण

जेव्हा राज्य शासनाने साखर सहकारी संस्थेतील भ्रष्टाचार कमी करण्यासाठी को. ऑप. सोसायटी मध्ये कठीण नियम लागू केले त्यावेळी आम्ही गृहनिर्माण संस्था त्या नियमांच्या अंतर्गत येणार नाहीत अशी आम्ही तरतूद केली. त्यामुळे गृहनिर्माण संस्था हया क्लिष्ट प्रक्रियेतून मुक्त झाल्या व संस्था निबंधक यांना गृहनिर्माण संस्थेवर कारवाई करण्याचे अवाजवी अधिकार मिळाले नाहीत.



# मला असे वाटते की पायाभूत सुविधा या कर देणाऱ्या नागरिकांचा हक्क आहे.

**जागतिक दर्जाचा मलबार हिल करण्याचा माझा प्रयत्न आहे व महाराष्ट्र राज्यात भाजपाचे सरकार आल्यावर त्यात भरच पडेल.**

## सीरी रोडच्या कनेक्टीव्हीटीने वाहतूकीची कोंडी सोडविणे

मलबार हिल मधील वाहतूकीची कोंडी सोडविण्यासाठी मी सीरी रोड ते चौपाटी बँड स्टँडपर्यत वाहतूक सुरु केली आहे. माझ्या चार वर्षांच्या अथक प्रयत्नानंतर महानगरपालिकेने या प्रस्तावाला मान्यता दिली व ही वाहतूक सुरु झाली. नेपीयन्सी रस्त्याचे रुंदीकरण मी तेथील स्थानिक रहिवासी असोसिएशनच्या मदतीने सुरु केले आहे.

## मरिन लाईन्स रेल्वेवरील पूल

माझा आमदार फंड वापरुन मी चर्नीरोड स्टेशन, बिर्ला क्रिडा केंद्र ते ऑपेरा हाऊस हा पूल पादचारी बांधला आहे.

## बाणगंगा टँकचे नूतनीकरण

बाणगंगा टँक हा आमचा इतिहास आणि संस्कृतीचा एक महत्वाचा भाग आहे. मी लोकांना उपासना आणि पर्यटनाठी प्रोत्साहित करण्यासाठी संपूर्ण बाणगंगा टँक पुनर्रचित करण्याचा प्रकल्प हाती घेतला आहे.



## वसंतदादा पाटील उद्यानाचे सुशोभीकरण

खूप वर्षांपासून वसंतदादा पाटील उद्यानाचा वापर डंपिंग आवार व टॅक्सी स्टँडसाठी होत होता. मी पुढाकार घेऊन या उद्यानाचा विकास, सार्वजनिक वापरासाठी केला आहे.

## ज्येष्ठ नागरिक पार्क उभारणे व कमला नेहरु पार्कमधल्या मुलांच्या मैदानात सूधारणा करणे

माझा आमदार फंड वापरुन मी ज्येष्ठ नागरिकांसाठी पार्क बांधला व कमला नेहरु पार्कमधल्या मैदानात सुधारणा केल्या.



## चंदनवाडी आणि बाणगंगा प्रेतदहन घाटाचे नूतनीकरण

माझ्या पुढाकाराने या दोन्ही घाटाचे नूतनीकरण केले आहे.



## बाबुलनाथ मंदिरातील पवित्र पाण्याचे पुननिर्देशन

बाबुलनाथ मंदिरातल्या शिवलिंग अभिषेकाचे पाणी गटारात जात होते. लोकांच्या भावना लक्षात घेऊन हे पाणी थेट समुद्रात जाईल अशी मी व्यवस्था केली.

## मोडकळीस आलेल्या इमारतींचे दुरुस्तीकरण

आमदार फंड वापरुन मी धोबी घाट मंदिर, महालक्ष्मी मंदिर, सारस्वत कॉलनी, निरज सोसायटी इ. इमारतींचे दुरुस्तीकरण केले आहे.

## बिर्ला क्रिडा केंद्राच्या सभागृहाचे पुन:वापर सुरु करणे

मलबार हिलमध्ये बिर्ला क्रिडा केंद्राचे सभागृह खुप वर्षांपासून बंद पडले होता. त्याच्या नूतनीकरणासाठी मी एक कोटी रुपये दिले आहेत आणि हे सभागृह २०१५ मध्ये सार्वजनिक वापरासाठी पुन्हा उघडला जाईल.

**जनतेकरीता वाहतुक सुविधा, ओव्हर ब्रिज तसेच बगिच्यांच्या डागडुजी बाबत कार्यरत आहे.**

## सौर व एलईडी दिवे लावण्याबाबत

रस्ते पर्यावरण सुकर पध्दतीने प्रकाशमान करण्यासाठी हँगींग गार्डन आणि ब्रिच कॅन्डी येथील सिल्वर ओक स्ट्रीट येथे सौर आणि एलईडी दिवे कार्यान्वित करण्यात आले आहेत. प्राथमिक चाचणीनंतर ही सुविधा संपूर्ण मलबार हिल परिसरात उपलब्ध करुन देण्यात येईल.

## आपल्या ध्येयवादी नायकांचा सन्मान – तुकाराम ओंबळे यांच्या पुतळयाची उभारणी

२००८ च्या मुंबईतील दहशतवादी हल्ल्यामध्ये तुकाराम ओंबळे यांनी आपले जीवन अर्पण केले. त्यांना अशोकचक्र प्रदान करण्यात आले. २६ नोव्हेंबर २००९ मध्ये गिरगाव चौपाटीवर मी त्यांचा पुतळा उभारला आहे.



## नाना शंकर शेट यांच्या पुतळयाचे सुशोभीकरण

राज्य सरकारने दुर्लक्ष केलेल्या सर नाना जगन्नाथ शंकर शेट यांच्या पुतळयाचे मी नूतनीकरण केले.




लोढा फाउंडेशन अ‍ॅम्ब्युलन्स सेवा

# फिरत्या आरोग्य चिकित्सा माध्यमातून सहज मिळणाऱ्या आरोग्य सुविधा देणे

### शरिराच्या स्वास्थ्याकरीता फिरता दवाखाना

संपूर्ण समुदायास आरोग्य सेवा देण्याच्या हेतूने मी मलबार हिलमध्ये फिरता दवाखाना सुरु केला. दरवर्षी ६०,००० रुग्ण याचा लाभ घेतात. सकाळी आणि संध्याकाळी दोन तास मोफत वैद्यकीय शिबिर आयोजित करुन मोफत औषधे आणि चाचण्या करण्याची तरतूद आहे.

### वैद्यकिय मदत

वेगवेगळया संस्था तसेच फंडातून गरजवंतांना २ कोटींपेक्षा जास्त वैद्यकिय मदत तसेच वैद्यकिय बिलांमध्ये १ कोटीपेक्षा जास्त सूट मिळवून दिली.

### शालेय आरोग्य शिबिराचे आयोजन

आम्ही ३५ अनुदानित खाजगी शाळांमध्ये प्राथमिक आणि माध्यमिक स्तरावर, दरवर्षी सुमारे १५,००० मुलांचे नियमित आरोग्य तपासणीची व्यवस्था केली आहे. डॉक्टरांच्या शिफारशीची एक



मोबाईल आरोग्य दवाखाना

प्रत शाळेला दिली जाते जेणेकरुन शाळा पालकांचा पाठपुरावा करु शकते.

## निरोगी महिला अभियान : महिलांची मोफत वैद्यकीय तपासणी



निरोगी महिला अभियान (रोगमुक्त महिलांसाठी मोहीम) विशेषतः समाजातील आर्थिकदृष्टया गरीब आणि वैद्यकीय अडचणीत सापडलेल्या झोपडपट्टयामधे राहणाऱ्या महिला, पौगंडावस्थेतील मुली यांची मोफत वैद्यकीय तपासणीसाठी शिबिर आयोजित केले जाते.

## मलेरिया व डेंग्यू नियंत्रण

झोपडपट्टया आणि गृहनिर्माण समाजात निचरा प्रणालीमध्ये पाणी साठून राहून मलेरिया व डेंग्यूची पैदास होते. माझ्या क्षेत्रात मी फॉगिंग मशीनची व्यवस्था व वापर सुरु केला आहे.

## पाण्याच्या टाक्या साफ करण्याबाबत

स्वच्छ व सुरक्षित पिण्याच्या पाण्याची खात्री करण्यासाठी मी ५०० पेक्षा अधिक संकुले व ४,००० पेक्षा अधिक टाक्या दरवर्षी साफ करण्याचा प्रकल्प सुरु केला आहे. ज्यामध्ये गृहनिर्माण संस्था, शाळा, महाविद्यालये, पोलीस स्टेशन यांच्या टाक्यांचा समावेश आहे.

## जेनेरिक औषधांचे दुकान

जेनेरिक औषधांचे दुकान सेंट्रल प्लाझा जवळ, गिरगाव येथे उघडले आहे. येथे कमी खर्चात चांगल्या दर्जाची २७० प्रकारची औषधे रुग्णांना उपलब्ध आहेत. दरवर्षी ३०,००० रुग्ण याचा लाभ घेतात.

भविष्यातील निरोगी जीवनासाठी, स्वच्छता व मोफत वैद्यकीय सुविधा गरजेची आहे.




कमी किंमतीत औषधे विक्री


IACOCCA

# मुंबईतील तरुणांच्या कार्यक्षमतांना वाव देणारे

## शारदा मंदिर हायस्कूलच्या पुन:प्रारंभास सुरुवात

मलबार हिल मतदारसंघामध्ये अधिक शाळा स्थापन करण्याची खात्री देत मी माझ्या प्रयत्नांनी अलीकडेच गावदेवी येथे शारदा मंदीर हायस्कूलच्या पुर्नप्रारंभाची सुरुवात केली आहे. ही शाळा अक्षरश: बंद पडली होती आणि या शाळेद्वारे आता १००० पेक्षा अधिक एसएससी/ आयसीएसई माध्यमाच्या नवीन शालेय जागा विद्यार्थ्यांना योग्य शुल्कात पुरविण्यात येतात.

## न्यू इरा शाळा बंद होण्यापासून सावरले

पेडर रोड येथील न्यू इरा शाळा बंद पडली होती. जोपर्यंत राज्य शासन यासंदर्भातील निर्णय मागे घेत नाही तोपर्यंत मी नऊ दिवसांकरिता शाळेच्या बाहेर अन्नत्याग करुन उपोषणाला बसलो होतो.

## दुर्बल घटकांकरिता शिष्यवृत्ती योजनेस आरंभ

समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांमधील गुणवंत विद्यार्थ्यांना आर्थिक मदत करण्याच्या हेतूने लोढा फाऊंडेशनमार्फत शिष्यवृत्ती योजनेस आरंभ करण्यात आला. या शिष्यवृत्तीमुळे सुमारे ५००० विद्यार्थी सदर कार्यक्रमाच्या आरंभानंतर ५ वर्षे शाळेत उपस्थित राहण्याचा आनंद उपभोगत आहेत.



## प्रौढांकरिता इंग्रजी संभाषण वर्ग

आजच्या सामुदायिक जगात इंग्रजीमध्ये संवाद साधण्याच्या कौशल्याने प्रचंड स्वरुपात संधी निर्माण झालेल्या आहेत. आम्ही इंग्रजी संभाषणाच्या क्षमतेत सुधारणा करण्यासाठी एका कार्यक्रमाची संकल्पना आखली ज्यामुळे वर्षाला सुमारे ५०० व्यक्तींना विशेषतः युवा-प्रौढ व्यक्तींना आणि ज्यांना शाळेत भाषा शिकण्याची संधी मिळत नाही अशा गृहिणींना याचा लाभ मिळाला आहे.



व्यक्तिमत्व विकास प्रशिक्षण घेताना विद्यार्थी

## करियर मार्गदर्शन शिबीर

विविध शाळा आणि महाविद्यालयांच्या सहयोगाने आम्ही करियर मार्गदर्शन शिबीराचे आयोजन केले, ज्याद्वारे आम्ही दर वर्षाला सुमारे ७००० विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचून त्यांना त्यांच्या करियर नियोजनासंदर्भातील तपशीलवार माहिती उपलब्ध करुन दिली आहे.

## मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन

जेथे स्त्रिया त्यांच्या वैयक्तिक विकासासंदर्भात स्वतंत्रपणे निर्णय घेऊन समाजामध्ये समानतेच्या भावनेने राहू शकतात अशा प्रकारचे वातावरण निर्माण करण्याच्या उद्देशाने मुलींचे शिक्षण माझ्याकरिता अधिक महत्वाचे आहे. ज्या मुलींनी आपले शालेय शिक्षण मध्येच सोडले आहे अशा मुलींना माध्यमिक ते पदवीपूर्व स्तरापर्यंच्या शिक्षणप्रवाहात सामील करुन तसेच त्यांना मुक्त विद्यापीठाच्या विविध अभ्यासक्रमांमध्ये सहभागी करुन मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्याचे कार्य करत आहोत.



## लोकांपर्यंत पुस्तके पोहोचविण्यासाठी फिरते वाचनालय

ज्या लोकांना त्यांच्या घरापासून दूरवर स्थित असलेल्या वाचनालयात जाणे शक्य होत नाही अशा लोकांची वाचनाची गरज भागविण्याच्या उद्देशाने फिरत्या वाचनालयाची संकल्पना उदयास आली. प्रत्येक फिरत्या वाचनालयाची गाडी आसपासच्या क्षेत्रात जाते आणि आठवड्यातून विविध ४८ ठिकाणी थांबून सुमारे ४००० लोकांपर्यंत वाचनाची सेवा पुरविण्याचे काम करते.



## इंटरनेट, संगणक, स्मार्ट फोन प्रशिक्षण

उत्तम प्रकारे संवाद साधून स्वतः ला अद्ययावत ठेवण्याकरिता नवीन तंत्रज्ञानाचा वापर लोकांपर्यंत पोहोचवून भारताचा तंत्रज्ञानाच्या दृष्टीने कायापालट करण्याच्या उद्देशाने सुमारे ७००० नागरिकांकरिता (वय ४० वर्षापेक्षा अधिक) प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले ज्याद्वारे ते इंटरनेट, संगणक, स्मार्टफोन इ. चा वापर करु शकतील आणि त्यामुळे आपण तंत्रज्ञानाच्या क्रांतीमधून अलिप्त नाही याची खात्री त्यांना होईल.



## अल्प उत्पन्न गटातील विद्यार्थ्यांकरिता अभ्यास केंद्र

मी ज्यांना अभ्यास करण्यासाठी घरामध्ये पुरेशी व योग्य जागा उपलब्ध नाही अशा अल्प उत्पन्न गटातील विद्यार्थ्यांकरिता खेतवाडीमध्ये अभ्यास केंद्र विकसित केले आहे. अभ्यास क्रेंद्र हे दर दिवशी सकाळी ८ ते रात्री १० पर्यंत खुले असते तसेच ते २००० पेक्षा अधिक शैक्षणिक पुस्तकांनी समृद्ध आहे.

**नवीन शाळा, जुन्या बाबींचे पुनरुज्जीवन आणि आवश्यक शैक्षणिक मदत प्रदान करते. सुशिक्षित पिढी आपल्या राष्ट्राची गुणवत्ता उंचावेल.**

## शैक्षणिक साहित्यांचे वाटप

आम्ही दर वर्षी मलबार हिल येथील शासकीय अनुदानित आणि खासगी शाळांमधील सुमारे ३००० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांना शैक्षणिक पुस्तके, शालेय बॅगा आणि वह्यांचे वितरण करतो.



# प्रशिक्षण, स्वयं सहाय्य प्रदान करुन करियर घडविले जाते. कारण प्रत्येक मेहनती नागरिक संधीकरिता पात्र आहे.

**स्त्रियांकरिता स्वयं सहायता गट**

२००० पेक्षा अधिक स्त्रिया समाविष्ट असलेले सुमारे २१२ स्वयं सहायता गट स्त्रियांद्वारे स्थापन करण्यात आले आहेत ज्याद्वारे त्यांच्यामध्ये बचत करण्याची सवय रुजवली जाते त्यासोबतच त्यांना आर्थिकदृष्ट्या मदत करण्यासाठी लघु उद्योग कामामध्ये व्यस्त करुन सामजिक उपक्रमांमध्ये देखील सहभागी केले जाते.



## प्रतिभावंत युवक तयार करण्यासाठी रोजगार संधान कार्यक्रम

रोजगार संधान कार्यक्रम (एम्प्लॉयमेंट लिंकेज प्रोग्राम) हा १८-३५ वर्ष वयोगटातील तरुणांना मुलाखतीची तयारी, स्वतःचा वैयक्तिक तपशील तयार करण्यास मदत करतो तसेच रोजगार मिळविण्यासंबंधात त्यांना मार्गदर्शक म्हणून देखील ठरतो. आम्ही प्रत्येक वर्षाला सुमारे १००० तरुणांना मदत केली आहे.

माझा विश्वास आहे की कमी नशीबवान लोकांना प्रशिक्षणापासून वंचित राहावे लागणार नाही. या कार्यक्रमामुळे प्रत्येक व्यक्तीला तिचे उपजिवीकेचे साधन मिळविण्याची संधी मिळत आहे.

## स्त्रियांकरिता व्यावसायिक प्रशिक्षण

व्यावसायिक प्रशिक्षण कार्यक्रमाद्वारे स्त्रियांना स्वयं-रोजगाराद्वारे रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन आत्मनिर्भर बनविण्याचा प्रयत्न केला जातो. या कार्यक्रमामध्ये दरवर्षी १,२०० पेक्षा अधिक स्त्रियांना खेळणी, इमिटेशन ज्वेलरी, सौंदर्यीकरण आणि मेहंदी डिझाईनचे प्रशिक्षण दिले जाते.

## संगणक आणि मोबाईल दुरुस्ती प्रशिक्षण

आम्ही चार संगणक प्रशिक्षण केंद्र चालवित आहोत ज्याद्वारे स्वयं- रोजगार निर्माण करण्याकरिता संगणक हार्डवेअर आणि मोबाईल दुरुस्ती अभ्यासक्रमाचे व्यावसायिक प्रशिक्षण याठिकाणी दिले जाते. दिवसेंदिवस संगणक आणि स्मार्टफोनच्या वापरात झालेली वाढ विचारात घेता या अभ्यासक्रमांची मागणी वाढत आहे.









शहीद वीर जवानांना श्रध्दांजली अर्पण करताना
श्री नरेंद्रभाई मोदी आणि भारतरत्न लता मंगेशकर

# प्रशिक्षण, स्वयं सहाय्य प्रदान करुन करियर घडविले जाते. कारण प्रत्येक मेहनती नागरिक संधीकरिता पात्र आहे.

**श्रेष्ठ भारत : भारतीय संरक्षक दलातील सैनिकांना समर्पित**

२७ जानेवारी २०१४ रोजी भारतीय सैन्य दलास अर्पण केलेले 'ए मेरे वतन के लोगो' या देशभक्तीपर गीतास ५० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्ताने 'श्रेष्ठ भारत' दिन म्हणून आम्ही ही संकल्पना साकार केली आहे. या दिवशी १०० पेक्षा अधिक शौर्यपदक विजेत्यांचा १,५०,००० लोकांसमक्ष श्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. भारतरत्न लता मंगेशकर देखील या गीताची सुवर्ण जयंती साजरी करण्यासाठी वैयक्तिकरित्या हजर होत्या.







## मलबार हिल महोत्सव: जेव्हा सर्व समुदाय एकत्रित येतो

आम्ही क्रिडा, संस्कृति आणि कला आमच्या विधानसभा मतदारसंघामध्ये मलबार हिल महोत्सवांतर्गत दरवर्षी आयोजित करतो. १०,००० पेक्षा अधिक जनता दरवर्षी मलबार हिल महोत्सवाच्या वेगवेगळया कार्यक्रमांमध्ये सहभाग घेतात.

## मुंबई गणेश महोत्सव

मुंबईतील सर्वात लोकप्रिय आणि सन्मानित करण्यात आलेला मुंबई गणेश महोत्सव, गिल्डर लेन, ग्रॅन्टरोड येथे आयोजित करतो. या गणपती उत्सवात महान संस्कृति व इतिहासाची जपणूक करुन आजच्या युवा पिढीला प्रोत्साहन देण्याकरिता देशभक्ती आणि राष्ट्रवाद या प्रदर्शनातून साजरा केला जातो.

काही वर्षामध्ये मलबार हिल महोत्सवासारख्या छोटया रोपटयाचे आपल्या सहकार्याने आज वटवृक्षात रुपांतर झाले आहे.

## ध्वजारोहण समारोहाचे आयोजन

राष्ट्राचा अभिमान माझ्या हृदयात आहे. ऐक्य आणि देशभक्तीची भावना लक्षात घेऊन प्रजासत्ताक दिन आणि स्वातंत्र्य दिवशी २००० गृहनिर्माण संस्थांमध्ये ध्वजारोहण समारोहाचे आयोजन केले जाते.

Open letter

# "If Mumbai does well, Malabar Hill will do great."

MLA **Mangal Prabhat Lodha** of the Malabar Hill constituency shares an open letter with Mumbaikars

Dear Mumbaikars,

The Malabar Hill constituency has been very close to my heart—I have lived here for almost 30 years and the constituency is home to a large number of my family, friends and well-wishers—what I call my Malabar Hill family. I am really grateful to the citizens of the constituency for supporting me in every endeavour and hope to continue serving them in the best possible manner.

I believe that the first duty of a public representative is to be available for his constituents. Not only has my mobile number remained the same for the last 20 years but I am proud to say that I have always stood by my constituents, whatever be the occasion and whenever there's a need. I begin each morning by meeting citizens at my residence to hear (directly from them) about what we can do to make Malabar Hill even better. After personally following up with the concerned authorities on actions to be taken, I monitor each task with equal attention. 'Hamesha Aapke Saath' is my philosophy and I have tried to deliver on this promise in every possible way.



My aim is to make Mumbai one of the world's most thriving cities—if Mumbai does well, Malabar Hill will do great. Mumbai continues to remain the commercial capital of the country but I believe that we need to do a lot more to create jobs, encourage businesses and improve the quality of life. The neglect of Mumbai by the State Government needs to be addressed and I am sure that with the advent of the new Central Government led by Shri Narendra bhai Modi and a new government coming to Maharashtra soon, Mumbai's future is not only good but great.

Just as I was the first one to propose the revolutionary Right to Information Act (presented as a Private Member's Bill in late 1990s by me), I am constantly pushing for policies and actions that will benefit the city. So, when I write to you today, it is not about what I have already done for the constituency but about my immediate plans for this great city that we call home.

## My immediate plan to transform Mumbai





- Making Mumbai the best place to conduct business in India, through measures like the repeal of octroi and the abolishment of the excess license culture. This will ensure job creation and income growth.
- Building a new link road that will connect Nariman Point to Worli, within five years. This will decongest Malabar Hill's roads and reduce travel time.
- Ensuring at least five new ICSE/SSC schools in the Malabar Hill constituency, using the premises of closed or underutilised municipal schools; in all, 10,000 new school seats with preference for local residents.
- Improving public security especially for senior citizens, women and children, through enhanced lighting of all public spaces, facilitation of domestic help verification and a helpline for emergency response.
- Focussed effort on making all open spaces in our area better-equipped, better-managed and accessible to all residents.
- Prioritising environmental issues to make Malabar Hill a better place for future generations. It will be a community-led programme with features that range from solar street lighting to increased tree plantation and waste recycling.
- Ensure that all residents of cessed buildings in Malabar Hill get new homes on an ownership basis through re-development within the next 10 years and through the reform of the present regulations.

Connect and converse directly with MLA Lodha through facebook: http://www.fb.com/MPLodha and Twitter: http://www.twitter.com/MPLodha

# मी आमदार असल्याची जाणीव आहेच परंतू त्या भूमिकेच्या पलिकडे जावून मला कार्य करावयाचे आहे.

**हेल्पलाईन नंबर १२७८ : जबाबदार प्रणाली बाबत**

मी मलबार हिल क्षेत्रातील जनतेकरिता २४ × ७ मदतीसाठी हेल्पलाईन सुरु केली असून, ज्यामध्ये नागरिकांच्या तक्रारी समजून घेऊन त्याची नोंद करुन जबाबदार प्रशासकीय यंत्रणेकडे समस्यांचे निरसन करण्यासंदर्भात सहकार्य केले जाते. याबाबत नागरिकांना होणाऱ्या धावपळीतून मुक्त करण्यासाठी प्रशासकीय यंत्रणांकडे आम्ही पाठपुराव करत असतो.



## नागरी समर्थनाकरिता महत्वाचे ओळखपत्र



आम्ही आमच्या स्वयंसेवकाच्या माध्यमातून नागरिकांच्या मदतीकरिता आधार कार्ड, पॅन कार्ड, वरिष्ठ नागरिक कार्ड आणि रेशनकार्ड मिळवून देतो. दरवर्षी मलबार हिल विधानसभा क्षेत्रातील २५,००० पेक्षा अधिक नागरिक पुढाकार घेऊन याचा फायदा घेतात.

## स्त्रियांकरीता धान्य वाटप

ही योजना ज्यांच्या कुटूंबामध्ये इतर कमावती व्यक्ती नसलेल्या ४५ ते ६५ वयोगटातील मुख्यत्वेकरुन निराधार आणि विधवा स्त्रियांसाठी असून त्यांना दरमहा गहू, तांदूळ, कडधान्य, तेल, चहा पावडर, साखर, मीठ घरातील प्रत्येक व्यक्तीला ३ वर्षाच्या कालावधीसाठी दिले जाते.

## आंबेडकर नगर झोपडपट्टीतील सोयसुविधांचे काय

शहरी आणि ग्रामीण भागांमध्ये मी लोकांच्या सुखसोयीसाठी अनेक कामे केली आहेत. नोव्हेंबर २०१३ मध्ये आंबेडकर नगर झोपडपट्टीत अचानकपणे लागलेल्या आगीमध्ये ५०० घरे नष्ट झाली आणि २,५०० लोकांचे जीवन विस्कळीत झाले. आमच्यातर्फे तात्काळ लोकांच्या मदतीकरिता त्यांना आरोग्य सेवा सुविधा व आहाराचा पुरवठा करण्यात आला.

## महाराष्ट्रात दुष्काळ प्रभावित क्षेत्रासाठी मदत

२०१३ मध्ये महाराष्ट्र शासनाला दुष्काळाला सामोरे जावे लागले, ग्रामीण महाराष्ट्रात पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आणि पाणी साठवणुकीकरिता बंधारे निर्माण केले जेणेकरुन मुंबईची सुरक्षितता निश्चित होऊन महाराष्ट्रात दुष्काळाची तीव्रता कमी होईल.

## अंतिम यात्रा वाहन

आमच्या विभागातील शववाहिन्यांच्या कमतरतेमुळे, अंतिम संस्काराकरिता आम्ही पुर्णपणे मोफत शववाहिनी सेवा चालू केली आहे.

## स्त्रियांकरीता स्वसंरक्षण वर्ग

स्त्रियांवरील अत्याचार आणि वाढणाऱ्या गुन्हयांना आळा बसावा म्हणून १८ ते ३० वयोगटातील मुली व स्त्रियांकरिता स्वसंरक्षण वर्ग चालु करण्यात आले आहेत.





## धार्मिक तीर्थयात्रा आयोजन

आमच्या विभागातील नागरिकांच्या आध्यात्मिक इच्छा पूर्ण करण्यासाठी नागरिकांना वेगवेगळया ठिकाणच्या तीर्थयात्रेचा लाभ घेता यावा यासाठी बस व रेल्वेचे आयोजन करीत आहोत.

## पूजेची नवीन ठिकाणे : पर्यटकांसाठी सुविधा

आपली संस्कृति आणि धर्माचे प्रसारण करणाऱ्या उपासकांच्या सुखसोयीसाठी आम्ही पूजेची दोन ठिकाणे सुरु केली आहेत – श्री साई धाम, नाशिक हायवे, ठाणे जवळ आणि लोढा धाम, अहमदाबाद हायवे, मिरारोड जवळ आहे.

महिलांच्या सुरक्षेकरिता, २४×७ हेल्पलाईन, सुखसोयी आणि धान्य वाटप. याव्यतिरिक्त इतर गोष्टी देखिल असतील परंतू मी याच गोष्टींना प्राधान्य देतो.

# यावेळी आमचे स्वप्न मोठे आहे. आणि अधिक महत्वाचे म्हणजे आम्ही तसे करु शकतो. चला मलबार हिलचा कायापालट करुया.

लवकरच महाराष्ट्रात भाजपा सत्तेवर येत आहे, मला मलबार हिल ज्या स्तरावर जाण्यास पात्र आहे त्या स्तरावर नेण्याची संधी प्राप्त झाली आहे. मला आपले समर्थन आणि आशीर्वादाची गरज असून आपले कुटूंबीय, मित्रमंडळी यांची मोठया संख्येने सहकार्याची गरज आहे जेणेकरुन मला याद्वारे येत्या ५ वर्षात मलबार हिलला जागतिक स्तराचे क्षेत्र म्हणून नावारुपास आणण्याचे माझे कार्य पूर्ण करता येईल.

जय हिंद!

मंगलप्रभात लोढा
आमदार - मलबार हिल

**बोलता नहीं, करता हूं**

# मुंबईचे रुप बदलुन टाकण्यासाठी माझी ७ - कलमी योजना

**व्यवसाय आणि रोजगार :** १५ ऑगस्ट रोजी श्री मोदी यांनी भारतात तयार केल्या जाणाऱ्या सर्व वस्तूंच्या भारतातील निर्माणास प्रोत्साहन देण्याचे आश्वासन दिले. वन पॉईंट टॅक्स सिस्टीममुळे आणि अतिरिक्त परवाना संस्कृतीचे समूळ उच्चाटन झाल्याने मुंबई हे शहर व्यवसायाकरिता भारतातील सर्वोत्तम शहर बनेल. यामुळे खात्रीलायक रोजगार निर्मिती होऊन मुंबईकरांच्या उत्पन्नात वाढ होईल.

**कनेक्टीव्हीटी :** नरीमन पॉईंटला वरळीला जोडणारा आणि त्यापुढे इस्टर्न एक्सप्रेस हायवेला जाऊन मिळणाऱ्या नव्या लिंकची रोडची निर्मिती ५ वर्षाच्या आत केली जाणार. त्यामुळे दक्षिण मुंबईच्या रस्त्यावर होणारी वाहतूक कोंडी कमी होऊन प्रवासाला लागणारा वेळही कमी होईल. मी ४ वर्षे सातत्याने केलेल्या पाठपुराव्यामुळे हँगींग गार्डन ते बाबूलनाथ या सीरी रोडला महानगरपालिकेकडून मान्यता मिळविण्यात यश आले आहे ही उत्तम सुरुवात आहे.

**शिक्षण :** मलबार हिल मतदार संघातील बंद पडलेल्या / पुरेशा विद्यार्थ्यांविना सुरु असलेल्या महापालिकेच्या शाळा पुन्हा सुरु करुन किमान ५ नविन आयसीएसई / एसएससी शाळा सुरु केली जाणार. त्यामुळे १०,००० नवे प्रवेश निश्चित होणार असून शाळांमध्ये प्रवेश देताना स्थानिक रहिवाशांना प्रथम प्राधान्य दिले जाईल आणि प्रवेश - प्रक्रिया नियंत्रीत असेल. शारदा मंदिर स्कुल, गावदेवी ही शाळा या आधीच सुरु करण्यात आली आहे.

**सुरक्षा :** सार्वजनिक ठिकाणी रात्रीच्या वेळी लख्ख उजेडाची व्यवस्था करणे. घरगडी ठेवताना त्याची पुर्णपणे चौकशी करणे आणि आणीबाणीच्या काळात मदत पुरवता यावी म्हणून हेल्पलाईन सुरु करणे व यामार्गाने सार्वजनिक सुरक्षेत, विशेषतः ज्येष्ठ नागरीक, स्त्रिया आणि लहान मुले यांच्या सुरक्षेत सुधारणा करणे

**खुल्या जागा:** आपल्या विभागातील खुल्या जागा अधिक सुसज्ज करण्यावर, त्यांचे उत्तम व्यवस्थापन करण्यावर आणि त्या सर्व नागरिकांकरीता खुल्या करण्यावर भर देणे. प्रियदर्शिनी पार्क आणि मुंबई सेंट्रल पार्क मध्ये ऑलिम्पिक दर्जाचे जलतरण तलाव बांधण्यात येणार.

**पर्यावरण :** मलबार हिल ही जागा आपल्या पुढच्या पिढ्यानांही राहण्याकरीता उत्तम ठरावी म्हणून पर्यावरणीय प्रश्नांना प्राधान्य देणे. याकरिता आयोजित केल्या गेलेल्या सामुहिक उपक्रमामध्ये रस्त्यावर सौर दिवे बसविणे.वृक्ष रोपणाचे प्रमाण वाढविणे आणि टाकाऊ कचऱ्याचे पुनश्चकण करणे यांचे समावेश असेल.

**निवास :** सध्या असलेल्या नियमामध्ये सुधारणा करुन पुढील १० वर्षांच्या आत मलबार हिल मधील जुन्या (३० वर्षांहुन जुन्या) सोसायटयांमधील आणि सेस लावण्यात आलेल्या इमारती मधील रहिवाशांना पुर्नविकासातून ओनरशिप बेसिसवर नविन घरे दिली जाण्याची खात्री देण्यात येत आहे.

## मुंबई चांगली राहिल तर, मलबार हिल महान गोष्टी करेल

BJP

अधिक माहितीकरिता कृपया **mangalprabhatlodha.com** वर किंवा **facebook.com/MPLodha** अथवा **@MPLodha** वर लॉग ऑन करा

मिराडोर बिल्डींग, पहिला मजला, ब्रिच कॅन्डी जवळ, भुलाभाई देसाई रोड, मुंबई-26

Printer: Jagruti Printer - Qty: 2000 | Publisher: Siddharth Ghame